**<u>प्रतिवादी क्र.३ व ४ तर्फे उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.</u>**

**३.** या दाव्यात सुभद्रा गोईलकर वादी असून नारायण मयेकर प्रतिवादी आहे. या दाव्यात चार प्रतिवादी आहेत. शंकर बापू देसाई माझे सख्खे चुलते होते. वादी क्र.२ त्यांची पत्नी असून वादी क्र.१ मुलगी आहे. शंकर देसाई ५ ते ६ वर्षांपूर्वी नरेवाडी, ता. गडहिंग्लज येथे मयत झालेले आहे. वादी मागील १५-२० वर्षांपासून मुंबई येथे राहतात. माझी व वादींची २०१२ साली या दाव्याबाबत मुंबई येथे चर्चा झाली होती.

**४.** मला शंकर देसाई यांनी पुर्वी प्रतिवादींच्या विरोधात या दाव्यातील मिळकतीं बाबत दावा दाखल केल्याची माहिती नाही. माझी व शंकरची या दाव्यातील जमिनी बाबत कधीही चर्चा झाली नव्हती. मला वादी क्र.१ ने या प्रकरणात साक्ष द्यायची आहे असे सांगितले होते. माझी व वादी क्र.१ ची दोन वर्षांपूर्वी शेवटची भेट झाली होती. मला वादी या प्रकरणाच्या तारखेला नियमित येत असल्याबाबत तसेच दावा दाखल करण्यासाठी आल्याची माहिती नाही. मी सध्या हा दावा कोण चालवित आहे याबाबत कागदपत्रे पाहिलेली नाहीत.

**५.** मला गट क्र.३१५ व ३१६ च्या जुन्या सर्वे क्रमांकाची व त्यांच्या क्षेत्राची माहिती नाही. रामचंद्र कृष्णा देसाई माझा भाऊ असून तो माझ्या शेजारी राहतो. मला हे प्रकरण चालविण्यासाठी माझा भाऊ आल्याची माहिती आहे. रामचंद्र आता आज रोजी गावी आहे. आज रोजी गट क्र.३१५ व ३१६ माझ्या ताब्यात नाही. मी मागील १०-१५ वर्षांपासून सदर जमिनींमध्ये गेलेलो नाही. सदर जमिनीलगत माझी अथवा रामचंद्रची बांधाला बांध लागून मिळकत नाही.

**६.** सदर मिळकतीतील ऊसाचे पिक माझ्या भावाच्या नावे कारखान्याला जात आहे. मी त्याबाबतची कागदपत्रे पाहिलेली नाही. माझ्या भावाला त्याच्या स्वतःच्या मालकीच्या जमिनी आहेत. आम्ही दोघे स्वतःच्या जमिनी स्वतंत्रपणे कसतो. मी दावा मिळकतींचे ७/१२ उतारे पाहिलेले नाहीत. मला दावा मिळकती बाबत शंकर देसाई व प्रतिवादी क्र.३ यांच्यामध्ये चाललेल्या कूळाच्या कामाबाबत माहिती नाही.

**७.** वादी प्रत्यक्षपणे दावा मिळकती कसत नाहीत. मला वादी व प्रतिवादींमध्ये कधी

अडथळा झाला याबाबत माहिती नाही. मला वादी व प्रतिवादींमध्ये कशाबाबत वाद आहे याची निश्चित माहिती नाही. मी वादी क्र.१ च्या सांगण्याप्रमाणे तिच्या वकिलांना भेटून माझे शपथपत्र दिले आहे. मी माझ्या शपथपत्रात वादी क्र.१ च्या सांगण्याप्रमाणे मजकूर लिहिलेला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.१० तर्फे उलटतपास – श्री. यू. जी. परुळेकर वकील.**

प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी घेतलेला उलट तपास प्रतिवादी क्र.१० तर्फे स्विकारण्यात आला आहे.

**सरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०७.०१.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.